IJARSCT
ISSN: 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Volume 6, Issue 8, April 2026
Impact Factor: 8.2

# गोंधळ: एक विधीनाट्य

डॉ. ईश्वर रंगनाथ ढोले
मराठी विभाग प्रमुख,
दोशी वकील आर्ट्स कॉलेज अँड जी. सी. यू.बी. सायन्स अँड कॉमर्स कॉलेज गोरेगाव रायगड.

**प्रस्तावना-**

महाराष्ट्राला समृद्ध अशा लोककलांचा वारसा लाभलेला आहे. महाराष्ट्राच्या लोकभूमिका, लोकगीते आणि लोकसाहित्य यामधून महाराष्ट्राची लोकसंस्कृती समर्थपणे उभी राहिली आहे. महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीमध्ये गोंधळ परंपरेचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. कुळधर्म कुळाचाराचा भाग म्हणून महाराष्ट्राच्या घराघरांमध्ये गोंधळाची परंपरा आहे. महाराष्ट्रामध्ये जवळजवळ सर्व जाती-जमातीत एखादे मंगल कार्य झाले, तर त्यानंतर या कार्याची सांगता विधीनाट्याच्या स्वरूपात कुलाचार पार पाडून केली जाते. विधीनाट्य गोंधळ, जागरण या स्वरूपात असते. गोंधळ हा एक त्याचाच भाग आहे. गोंधळ सादरीकरणाचे काम गोंधळी करतात. गोंधळी, ही देवीच्या भक्तांची भटके जीवन जगणारी एक जात आहे. गोंधळी जातीचे लोक देवीच्या उपासनेच्या स्वरूपात एक कुलाचार पार पाडतात. त्यालाच गोंधळ असे म्हणतात. गोंधळी जातीचे लोकच गोंधळ हे विधी नाट्य सादर करू शकतात. गोंधळी हे रेणुकेचे, देवीचे भगत असतात. महाराष्ट्रामध्ये गोंधळ्याच्या वेगवेगळ्या उपजाती सांगितलेल्या आहेत. असे असले तरी रेणुराव व कदमराव या दोन मुख्य जाती मानल्या जातात.

**गोंधळाची परंपरा-**

गोंधळ विधीनाट्याची परंपरा खूप प्राचीन अशी आहे. संत ज्ञानेश्वरांच्या 'ज्ञानेश्वरीतील' अनेक ओव्यांमधून गोंधळाचे अनेक उल्लेख आलेले आहेत. त्यामुळे ज्ञानेश्वर पूर्वकाळात गोंधळ आणि गोंधळी यांना महाराष्ट्रीय जीवनात महत्त्वाचे स्थान असले पाहिजे. असा निष्कर्ष काढता येतो. कर्नाटकातील 'गोंदल' नावाचा धार्मिक कुलाचार आणि गोंधळ या परिसरासत पहावयास मिळते. कर्नाटकातील गोंधळाच्या परंपरेचा उल्लेख सातव्या शतकातील कर्नाटक वाड्मयात आढळतात. तेव्हा या अनुषंगाने गोंधळाचा शोध आपल्याला सातव्या शतकापर्यंत घेता येतो. महाराष्ट्रात गोंधळाची परंपरा त्यापूर्वी असली पाहिजे. गोंधळी ही संस्था मुळची महाराष्ट्राचीच होती. प्रसार महाराष्ट्रात झाला. आणि पुढे तिचा प्रसार कर्नाटकात झाला. गोंधळाचे गोंदलात रूपांतर झाले असावे असे म्हणता येते. संत नामदेव, संत एकनाथ आणि संत रामदास यांच्या साहित्यातून गोंधळांचा उल्लेख कित्येक वेळेला आलेला आढळतो.

ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 8, April 2026
Impact Factor: 8.2

देवीसाठी घातलेल्या गोंधळाची लोककथा मराठी लोकजीवनात प्रचलित आहे. ती कथा अशी-"जमदग्नी ऋषीने परशुरामाला रेणुकीचे मुंडके कापून आणावयास सांगितले. परशुराम हा आपल्या घरी असल्यामुळे त्यांनी रेणुकीचा शिरच्छेद केला. पण तिचे शिर उडून सत्य लोकात गेले. तेथे ते इंद्राच्या दरबारी जाऊन पडले. इंद्राने ते आपल्या देव्हाऱ्यात ठेवले. पुढे जमदग्नीनेचा क्रोध शांत झाला. व त्याने परशुरामाला रेणुकेचे शीर आणण्यास सांगितले. तेव्हा परशुराम गोंधळाच्या वेशात इंद्रसभेत गेला. तेथे त्याने गोंधळ केला. इंद्राने प्रसन्न होऊन त्यास, वर मागावयास सांगितले. तेव्हा परशुरामाने रेणुकेच्या मुंडक्याची मागणी केली. पण इंद्राने त्याला एक अट घातली. की मुंडके घेऊन जाताना, त्याने मागे पहावयाचे नाही. ते मुंडके घेऊन येत असताना परशुरामाने मागे पाहिले आणि रेणुकीचे मुंडके त्या जागेवर राहिले. तेव्हापासून रेणुकेच्या मुंडक्याचीच उपासना केली जाते. या कथेवरून रेणुकेच्या उपासनेतील गोंधळाचे महत्त्व आपल्या लक्षात येते.

### गोंधळाचे प्रकार-

गोंधळाचे उत्तम, मध्यम व कनिष्ठ असे तीन प्रकार सांगण्यात आलेले आहेत. या प्रकारात गोंधळी वृंदाच्या संख्येवरून हे प्रकार ठरवण्यात आलेले आहेत. गोंधळी वृंदांच्या संदर्भात भारतातील प्राचीन ग्रंथातून वरील प्रमाणे संख्या दर्शवण्यात आली असली तरी, महाराष्ट्रात आज गोंधळ प्रचलित आहेत. त्यातील गोंधळाची संख्या चार ते आठ अशी असते. आज रूढ असलेल्या गोंधळाच्या प्रकारात काकड्या गोंधळ व संबळ्या गोंधळ असे दोन प्रकार आढळतात. या दोन गोंधळ प्रकारातही आज सरमिसळ झालेली पाहायला मिळते. काकड्या गोंधळात, काकडे पेटवून गोंधळाची संभावने करण्यात येते. तर  संबळ्या गोंधळात संबळ, तुंतुने या वाद्याच्या संगतीत गोंधळ केला जातो. पण या दोन्ही प्रकारच्या गोंधळाचे स्वतंत्र अस्तित्व आज कमी होऊन प्रामुख्याने संबळ, तुंतुण्याचा गोंधळ करताना दिवट्या पेटविल्या जाऊन गोंधळ केला जातो. महाराष्ट्रात घराण्याचा एक कुलाचार म्हणून गोंधळ घालण्याची प्रथा आजही, काही घराण्यात पाहावयास मिळते. गोंधळात पूजा विधिला विशेष महत्त्व असते. पूजेची मांडणी करूनच गोंधळाला सुरुवात केली जाते. गोंधळात पौराणिक घटना प्रसंगावर आधारित कथा, गीत, गायन, नृत्य आणि संगीताच्या साथीने रात्रभर हा गोंधळ केला जातो. नृत्य, नाट्य आणि संगीत याची साथ असलेला गोंधळ एक विधीनाट्य म्हणून, लोकधर्मी नाट्य म्हणून वैशिष्ट्यपूर्ण असा आहे. अशा गोंधळाचे स्वरूप पुढील प्रमाणे पहावयास मिळते.

### गोंधळाचे स्वरूप-

गोंधळाचे पूर्वरंग आणि उत्तर-रंग अशा दोन भागात विभागणी केली जाते. पूर्वरंगात पूजा मांडणी, गण आणि विविध देव-देवतांना गोंधळात येण्याचे आव्हान, देवीची स्तुतीपर गाणी यांचा समावेश होतो. तर उत्तर रंगात पौराणिक व्यक्ती, घटना, प्रसंग यावर आधारित कथा गीतांचे सादरीकरण व शेवटी आरती असते.


DOI: 10.48175/IJARSCT-33172

पूजाविधि,घराण्याचा कुलधर्म आणि कुलाचार म्हणून देवीचा गोंधळ घातला जातो. देवीचे उपासक गोंधळी असल्यामुळे गोंधळच्या एका संचात चार ते पाच व्यक्ती असतात. त्यांना सन्मानाने भोजनास बोलविले जाते. गोंधळाचा विधी प्रामुख्याने संध्याकाळी सुरू होऊन तो रात्रभर चालतो. गोंधळात घट बांधणी किंवा देवीची स्थापना यांना महत्त्व असते. घट बांधणे, घट मांडणी किंवा देवीची स्थापना हा देवीच्या पूजेचा विधी असतो. यात एका चौरंगावर नवे वस्त्र टाकून, त्यावर तांदळाचा चौक भरतात. या चौकावर हळदीकुंकू वाहून चौरंगाला मखर बांधतात. मखर बांधताना केळीचे खांब किंवा ऊस किंवा शाळूच्या ज्वारीची ताटे उभी करतात. तांदळाच्या चौकावर सुपारी ठेवून तिची पूजा करतात. ही सुपारी विघ्नहर्ता गणपतीची प्रतीक असते. चौरंगावरच हळदीकुंकू आणि नवग्रह काढून चौरंगाच्या मध्यावर तांब्याचा कलश ठेवून, त्याच्या मुखावर विड्याची पाने व नारळ उभे ठेवतात. याला घटस्थापना म्हणतात. या कलशापुढे विड्याच्या पानावर हळदीकुंकू, बदाम, खारीक, सुपारी, खोबऱ्याची वाटी व केळी ठेवून त्यांची पूजा करतात. चौरंगावर मध्यभागी असलेल्या कलश यावर व चौरंगाच्या चारही कोपऱ्यावर फुलांच्या माळा सोडतात. बाजूलाच दिवटी पेटवून ठेवतात. गोंधळाच्या मार्गदर्शनाखाली पती- पत्नी किंवा नवीन लग्न झालेली जोडपे ही पूजा करतात.

गोंधळाचा पूर्व रंग-

या पूजा विधीनंतर प्रत्यक्ष गोंधळाच्या पूर्वरंगाला सुरुवात होते. पारंपरिक वेशभूषेत गोंधळी आपल्या पारंपरिक वाद्यसह गोंधळाला उभे राहतात. लाल रंगाचा पायापर्यंत येणारा फेटा डोक्याला लाल रंगाचे मुंडासे, कमरेला बांधलेला पांढरा शेला, गळ्यात कवड्यांची माळ असा पोशाख मुख्य गोंधळाचा असतो. तर त्याचे साथीदार डोक्याला मुंडासे किंवा फेटा, अंगात घोळधार सदरा, पाय घोळ धोतर आणि कमरेला शेला असा पोशाख परिधान करतात. या प्रत्येक साथीदाराजवळ एक-एक वाद्य असते. गोंधळात संबळ, तुणतुणे, झांज, डमरू, कडी या वाद्याचा प्रामुख्याने उपयोग केला जातो. मुख्य गोंधळी प्रथम हाती पेटती मशाल घेऊन गणाला सुरुवात करतो. गणात गणपतीची महात्मा पर गाणी असतात. कार्यनिर्विघ्न पार पाडले जावे, म्हणून गण म्हणण्यात येतो. मुख्य गोंधळी गण म्हणतो व त्याचे साथीदार गाण्यात व संगीतात साथ देतात. मधून-मधून गोंधळी नृत्यही करतो. गणा नंतर निरनिराळ्या देव-देवतांना गोंधळास येण्याचे आव्हान केले जाते. हे आव्हानही मोठे नाट्यपूर्ण असते. मुख्य गोंधळी प्रथम गोंधळास कोणी यावे, असा प्रश्न विचारतो तेव्हा, त्याचे साथीदार, 'मुळाआर्भी गजवदना गणपती गोंधळा यावे' असे उत्तर देतो. आणि मग मुख्य गोंधळी विविध देवदेवतांना गोंधळात येण्याचे आव्हान करतो. यामध्ये तुळजापूरची भवानी, माहूरची रेणुका माता, अनुसया, दत्तात्रेय, औंढा नागनाथ, परळीच्या वैद्यनाथा अशी विविध देवदेवतांना गोंधळाला येण्याचे आव्हान करतो. या देवदेवता स्थानिक आणि त्या-त्या परिसरातील असतात. या सर्वांना गोंधळी गोंधळाला येण्याची विनंती करतो.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 8, April 2026
Impact Factor: 8.2

**गोंधळाचा उत्तर - रंग:**

गोंधळातील उत्तर-रंग कथा, नाट्य, नृत्य आणि संगीत या दृष्टीने रंगतदार असतो. उत्तर रंगात गोंधळी पौराणिक घटनांवर आधारित कथा गीत सादर करतो. अशा कथा गीतात रेणुका, जमदग्नी आणि परशुराम यांची कथा असते. हरिश्चंद्र, तारामती, श्रीयाळ, चांगुना, श्रावण, बाळ यासारख्या कथा असतात. याशिवाय रामाने देवीची प्रार्थना केली व देवीने रामला वर दिला. अशा आशयाची ही पुराण कथा गोंधळी आपल्या कथा गीतात सांगतात. याशिवाय वीरसेन चंपू, जाया राणी या स्वरूपाच्या कथाही गोंधळात कधी कधी रंगविला जातात. यातील प्रत्येक कथेचा शेवट सुखात्मक केलेला असतो. गोंधळातील कथा, निवेदन शैली, नाट्य संवाद या दृष्टीने गोंधळाच्या कथा गीतांचे व सादरीकरणाचे विशेष लक्षात येण्यासारखे असतात.

**गोंधळातील वाद्य-**

गोंधळाची वाद्ये परंपरेने ठरलेली असतात. संबळ व तुणतुणे ही गोंधळाची प्रमुख वाद्ये असतात. संबळाची रचना वैशिष्ट्यपूर्ण असते. कपाच्या आकाराची दोन भांडी, वेल किंवा दोरीच्या साह्याने कातडी मढवलेली अशी संबळांची रचना असते. यालाच जोड समीर असे म्हणतात. गोंधळाचे दुसरे वाद्य तुणतूणे असते. हे वाद्य जवळजवळ सर्वच लोकनाट्य प्रकारात वापरले जाते. अवकाश तुणतून्याणे भारून टाकण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य, तुणतून्याच्या माध्यमातून केले जाते. हातात धरन्याइतके जाड असलेली, दोन अडीच फूट लांबीची, बांबूची काठी घेऊन तळाशी, पोकळ मोठ्या आकाराची लाकडी नळकांडी बसविलेली असते. या नळ कांड्याचा खालचा तळ बकऱ्याच्या कातड्याने मढवीलेला असतो. कातड्याच्या माध्यमातून ते बांबूच्या वरच्या टोकापर्यंत तार खेचून बसवितात आणि बांबूत खोसलेल्या छोट्या खुंटीस तार बांधतात. तुणतूणे डाव्या हातात धरून उजव्या हातातील लाकडाच्या तुकड्याने वाजविले जाते. तुणतूणे हे लोक रंगभूमीचे एक अविभाज्य घटक असते. गोंधळात फुंकून वाजविण्याची वाद्य नसतात. म्हणजेच सुस्वर वाद्य नसतात. छेडून वाजविणारी वाद्य आणि आघाताने वाजविणारी वाद्य म्हणजेच, अनुक्रमे- संबळ व तुणतूणे हे दोन गोंधळाची प्रमुख वाद्य असतात.

**निष्कर्ष-**

- गोंधळ ही पारंपारिक लोककला आहे.
- गोंधळ हे एक विधी नाट्य आहे.
- ही महाराष्ट्राची खास लोककला आहे.
- गोंधळाला खूप मोठी लोक परंपरा आहे.

- गोंधळ या कलेतून समाज प्रबोधनाचे काम केले जाते.

संदर्भ-

१. लोकधर्मी नाट्याची जडणघडण-शरद व्यवहारे
२. लोकरंगभूमी-प्रभाकर मांडे
३. गोंधळ परंपरा, स्वरूप आणि अविष्कार-रामचंद्र देखणे
४. लोकनागर रंगभूमी-तारा भवाळकर
५. लोकनाट्य दशावतार-बाळकृष्ण लळीत.